सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १३४ | बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
०४ फेब्रुवारी

- तानाजी मालुसरे यांचा सिंहगडावर मृत्यू.
- कृत्रिमरित्या तयार केलेले रेडियम हे पहिले किरणोत्सर्गी घटक बनले.
- आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर आणि आधुनिक बंगालचे शिल्पकार डॉ. बिधनचंद्र रॉय यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान.
- चंद्र ऑर्बिटर कार्यक्रमः सर्व्हेअर आणि अपोलो अंतराळयानासाठी संभाव्य लँडिंग साइट्स ओळखण्याच्या मोहिमेवर चंद्र ऑर्बिटर ३ ने केप कॅनावेरलच्या लाँच कॉम्प्लेक्स १३ वरून उड्डाण केले.
- जागतिक कर्करोग दिन

# वैद्यकीय अधीक्षकाचे प्रमाणपत्र निघाले बोगस!

## धक्कादायक ...! : निवृत्तीनंतर प्रकार उघडकीस, राज्यातील पहिलाच गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लाक्षणिक अपंगत्व नसताना अपंगगत्वाचे प्रमाणपत्र मिळवून शासकीय सेवेतील लाभ घेतल्याप्रकरणी ईश्वरपूरचे (जि. सांगली) निवृत्त वैद्यकीय अधीक्षकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत दाखल झालेला राज्यातील पहिला गुन्हा ठरला आहे. शासकीय, निमशासकीय सेवा, योजना व सुविधांचे लाभ घेणाऱ्या अपंगांना दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक अपंग ओळखपत्र बंधनकारक करण्यात आलेले आहे. तत्कालीन इस्लामपूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रघुनाथ राजराम भोई यांनी अपघातामध्ये अपंगत्व झाल्याने दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळविले होते. त्याआधारे त्यांनी शासकीय सेवेतील सोई सुविधांचा लाभ घेतला होता. २०१८ मध्ये अपंगांना वैश्विक ओळखपत्राची (युडीआयडी) पडताळणी सक्तीची करण्यात आली. अपंगत्वाच्या शासकीय लाभासाठी लाक्षणिक अपंगत्व (४० टक्के) असणे गरजेचे आहे. मात्र, डॉ. भोई यांचे अंपगत्व केवळ १५ टक्के निघाले. त्यामुळे कोल्हापूर




मंडळाचे आरोग्य उपसंचालक यांनी डॉ. भोई यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार डॉ. भोई यांच्यावर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ कलम ९१ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. शासकीय व निमशासकीय सेवेत व पदोन्नतीमध्ये लाक्षणिक अपंगांना ४ टक्के आरक्षण आहे. त्याचा लाभ उठवत अनेकांनी बनावट प्रमाणपत्र मिळवत नोकऱ्यात शिरकाव केलेला आहे. याला चाप लावण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी ऑक्टोबरमध्ये शासनाच्या सर्व विभागांना अपंग कोट्यातील शासकीय लाभधारकांच्या प्रमाणपत्राचे नुतनीकरण व वैश्विक ओळखपत्र पडताळणीचे आदेश दिलेले आहेत.

लाक्षणिक अपंग नसतानाही बनावट प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये जिल्हा परिषद शिक्षकांची मोठी संख्या आहे. बोगस अपंगांच्या विरोधात आजपर्यंत गुन्हे नोंद आहेत. मात्र, ते बनावट कागदपत्रासंदर्भातले आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमांतर्गत हा राज्यातला पहिला गुन्हा असून यामध्ये दोन वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद आहे. तसेच शासकीय लाभांची वसुली करण्यात येते. डॉ. भोई यांना २०११ मध्ये शासकीय सेवेत असताना अपघात झाला होता. त्यानंतर त्यांनी अपंग प्रमाणपत्र घेत शासकीय लाभ घेतले. डॉ. भोई हे निवृत्त झाल्यानंतर त्यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे. डॉ. भोई यांनी ज्या ईश्वरपूर येथे वैद्यकीय अधिक्षक म्हणून काम केले, तेथील विद्यमान वैद्यकीय अधीक्षकांनी त्यांच्यावर २९जानेवारी रोजी गुन्हा नोंद केला आहे.



दिव्यांगांसाठी असलेले लाभ फसवणुकीने मिळवणे हा गुन्हा आहे. त्यामुळे शासनाची फसवणूक होते. खऱ्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या हक्काच्या लाभांपासून वंचित राहावे लागते. दिव्यांगांसाठीच्या लाभांचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे.
**– तुकाराम मुंढे,**
**सचिव, दिव्यांग कल्याण विभाग.**

# बोगस दिव्यांगांचा लालपरीतील प्रवास थांबणार!

## वाहक, पर्यवेक्षकांच्या मोबाइलमध्ये आता ‘यूडीआयडी ॲप’!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बोगस अपंग प्रमाणपत्रे वापरून प्रवास करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी एसटी महामंडळाने योजना आखली आहे. बनावट वैश्विक अपंग ओळखपत्र (यूडीआयडी) बसमध्ये वापरून सवलतीचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांची पडताळणी होणार आहे. बस गाड्यांचे सर्व वाहक, पर्यवेक्षक आणि तपासणी कर्मचाऱ्यांच्या मोबाइलमध्ये आता ‘यूडीआयडी ॲप’ डाऊनलोड करून प्रत्येक दिव्यांग प्रवाशाची पडताळणी होणार आहे. असे आढळल्यास थेट गुन्हा दाखल करून बनावट ओळखपत्रही जप्त होणार आहेत.

**बोगस ओळखपत्रांचे प्रमाण वाढले**

अलीकडच्या काळात बनावट यूडीआयडी कार्डाचा वापर करून सवलतीत प्रवास करणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. अनेकजण रंगात बदल करून किंवा फोटो बदलून बोगस कार्ड तयार करतात. त्यामुळे एसटी महामंडळाचे आर्थिक नुकसान होत आहे. एसटी प्रवासात दिव्यांगांना मिळते सवलत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) दिव्यांग प्रवाशांना तिकिटाच्या दरात ७५ टक्के ते १०० टक्केपर्यंत सवलत देते. गंभीर अपंगत्व असलेल्या व्यक्तीसोबतएका सहायकालाही ५० टक्के सवलत मिळते. ही सवलत मिळविण्यासाठी ‘युनिक डिसेबिलिटी आयडी’ (यूडीआयडी) कार्ड असणे अनिवार्य आहे

**पात्र दिव्यांगांची मात्र काळजी घेतली जाणार**

मोहिमेचा उद्देश खऱ्या दिव्यांगांना त्रास देणे नसून, यंत्रणेतील त्रुटी दूर करणे हा आहे. ज्यांचे कार्ड वैध आणि खरे आहे, त्यांना कोणताही त्रास होणार नाही. याची काळजी घेण्याच्या सूचना एसटी महामंडळाने कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत.

**बोगस कार्ड होईल जप्त**

एखाद्या प्रवाशांचे ओळखपत्र बनावट आढळले तर बनावट ओळखपत्र जागीच जप्त केले जाईल. अशा प्रवाशावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**ओळखपत्राची पडताळणी**

कार्डवरील क्यूआर कोड स्कॅन केल्यावर संबंधित प्रवाशाची सर्व माहिती म्हणजेच नाव, अपंगत्वाचा प्रकार, वैधता ऑनलाइन दिसणार आहे. त्यामुळे दिव्यांग प्रवाशांची ओळख पटणार आहे.

**धावत्या बसमध्येही होणार तपासणी**

बनावट प्रमाणपत्रधारकांना आळा घालण्यासाठी एसटी महामंडळाचे भरारी पथके किंवा तपासणी अधिकारी धावत्या बसमध्ये केव्हाही चढून प्रवाशांच्या कार्डाची पडताळणी करू शकतात. त्यामुळे अशा प्रवाशांवर आळा बसणार आहे.

**ॲपमध्ये होणार ऑनलाइन पडताळणी**

एसटी महामंडळाने बनविलेल्या ॲपमध्ये दिव्यांग प्रमाणपत्राची ऑनलाइन पडताळणीची सुविधा आहे. त्यामुळे बनावट प्रमाणपत्र असलेल्यांवर त्वरित कारवाई होईल.

**जप्त ओळखपत्रांची नोंद**

भरारी पथकाने जप्त केलेल्या सर्व कार्डाची नोंद स्वतंत्र रजिस्टरमध्ये ठेवली जाणार आहे. जेणेकरून भविष्यात त्या व्यक्तीला पुन्हा असा प्रयत्न करता येणार नाही.






अमळनेर : उपमुख्याधिकारी रवींद्र चव्हाण यांना निवेदन देताना योगेश पाटील, रामजू जैन आदी.

# दिव्यांगांसाठी ५ टक्के राखीव निधी सरसकट द्यावा

## अमळनेर येथे दिव्यांग बांधवांचे पालिकेस निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ व महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयांनुसार पालिकांनी त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या किमान पाच टक्के निधी दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र, येथील पालिका हा निधी मर्यादित लाभार्थ्यांनाच देत आहे, असा आरोप दिव्यांग बांधवांनी केला आहे. याबाबत त्यांनी पालिका प्रशासनास निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की पालिकेकडून दरवर्षी दिव्यांगांसाठी ५ टक्के निधीची तरतूद केली जाते. मात्र, प्रत्यक्षात हा निधी टक्केवारीनुसार किंवा मोजक्या लाभार्थ्यांपुरताच वितरित होत आहे. त्यामुळे अनेक पात्र व गरजू दिव्यांग व्यक्ती त्यांच्या कायदेशीर हक्कापासून वंचित राहत आहेत. ही बाब गंभीर असून कायद्याच्या उद्देशाला बाधा आणणारी असल्याचे दिव्यांग संघटनांचे म्हणणे आहे. तसेच, दरवर्षी ५ टक्के निधीच्या लाभार्थ्यांची एकदाच अपंग प्रमाणपत्र पडताळणी करून त्यानंतर निधीचे सरसकट, पारदर्शक व समप्रमाणात वाटप करण्यात यावे. दिव्यांग व्यक्तींना सामाजिक व आर्थिक न्याय मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. निधी वाटपात भेदभाव, विलंब किंवा अपूर्ण प्रक्रिया होणे हे प्रशासकीय निष्काळजीपणाचे लक्षण आहे. भविष्यात कोणताही पात्र दिव्यांग व्यक्ती ५ टक्के निधीपासून वंचित राहणार नाही, यासाठी स्पष्ट कार्यपद्धती जाहीर करावी.

निवेदनावर योगेश पाटील, फारुख शेख, कलीम शेख, अहमद खान व रामजू जैन आदींच्या सह्या आहेत.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## टॅरिफवर ट्रम्प यांचा अचानक यू टर्न कसा ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत फोनवर चर्चा झाली. त्यानंतर अमेरिकेने भारतातून सामान आयातीवर लागणारा रेसिप्रोकल टॅरिफ २५ टक्क्यांनी घटवून १८ टक्के करण्याचा निर्णय घेतला. ही टॅरिफ कपात महत्वाची मानली जात आहे. मात्र, त्यांनी असा निर्णय अचानक कसा काय घेतला यामागे काय कारणे आहेत? सर्वात मोठे कारण म्हणजे अमेरिकेत महागाई कमी झालेली नाही. ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे भारतीय उत्पादने महाग झाले होते. त्यामुळे ट्रम्प यांच्यावर अमेरिच्या नागरिकाचा दबाव होता

# बाहेरगावी गेल्याची संधी साधून घर फोडले

## चोरट्यांनी गांधलीपुरातून ६६ हजारांचे दागिने केले लंपास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : घरमालक लग्नाला गेलेले असताना अज्ञात चोरट्यानी घर फोडून घरातील ६६ हजार रुपयांचे दागिने चोरून नेले. ही घटना सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी गांधलीपुरा भागात पहाटे उघडकीस आली.

मोईनखान हबीबखान पठाण ३१ जानेवारी रोजी रात्री नातेवाईकांच्या लग्नाला सुरत (गुजरात) येथे गेले होते. २ फेब्रुवारी रोजी पहाटे ते परत आले असता त्यांना घरातील सर्व साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यांना कपाट, लॉकरचे व वरच्या मजल्यावरील दोन्ही कपाटाचे कुलूप तोडलेले दिसले. खोलीच्या मागच्या दाराचे आणि खालच्या मजल्यावरील घराच्या मागच्या दाराचे कडी- कोयंडा तोडलेले होते. १२ ग्राम वजनाचे सोन्याचे नाणे व अंगठी, ५ हजार रुपयांची चांदी, १ हजार रुपये चांदीचे कडे असे एकूण ६६ हजार रुपयांचे दागिने चोरीस गेले आहेत. याप्रकरणी मोईनखान पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# पैशांची पिशवी लांबविणारे तिघे एकाच तासात जेरबंद

## अमळनेर पोलिसांची कामगिरी; वेले येथे सिनेस्टाईल आवळल्या मुसक्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अडत व्यापाऱ्याच्या मोटारसायकलवर ठेवलेली पैशांची पिशवी लांबविणाऱ्या चोरट्यांना एकाच तासात जेरबंद करण्याची कामगिरी अमळनेर पोलिसांनी केली आहे. ही घटना सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र बँकेजवळ घडली.

पोलिसांनी सांगितले, की बहादरपूर रस्त्यावरील झामी चौक परिसरातील अडत व्यापारी अण्णासाहेब साहेबराव महाजन हे सोमवारी दुपारी साडेबाराला मोटारसायकल वरून (एमएच१९ डीएक्स ४०५७) २ लाख ८ हजार रुपये बँकेत भरण्यासाठी निघाले होते. त्यांनी ‘आयसीआयसीआय’ बँकेत १ लाख ३० हजार रुपये भरल्यानंतर उरलेले ७८ हजार रुपये जमा करण्यासाठी महाराष्ट्र बँकेत गेले. दुपारी दीडला एका अनोळखी व्यक्तीने “ तुमचे पैसे खाली पडले आहेत” असे सांगितले. श्री. महाजन पैसे उचलण्यासाठी खाली वाकताच आरोपीने मोटारसायकलवर ठेवलेली पैशांची पिशवी घेऊन पळ काढला. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी तातडीने शोध पथकाला आदेश दिले. पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, हवालदार मिलिंद सोनार, प्रशांत पाटील, उज्वल म्हस्के, विनोद संदानशिव व नितीन मनोरे यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासून संशयित आरोपींचा माग काढला. तपासात तीन ते चार जण असल्याचे निष्पन्न झाले. ते चोपड्याकडे पलायन करत असल्याची माहिती मिळताच अमळनेर पोलिसांनी पाठलाग सुरू केला. चोपडा पोलिसांशी तात्काळ संपर्क साधला. वेले गावाजवळ चोपडा पोलिसांनी आरोपींना थांबवून ठेवले असता अमळनेर पोलिसांनी झडप घालून अवघ्या एका तासात तिघा आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी आपली नावे बालू बारगुंडा, शिवकुमार व्यंकटस्वामी बारगुंडा व गणेश शुभ्रमणी तेली (रा. अमरनगर, उज्जैन, मध्यप्रदेश) अशी सांगितली. त्यांच्याकडून चोरीची रक्कम जप्त करण्यात आली आहे. अमळनेर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. हेडकॉन्स्टेबल मिलिंद सोनार पुढील करीत आहेत. अमळनेर पोलिसांच्या तत्परतेमुळे व्यापाऱ्याचे पैसा परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले आहे.




अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरात भेटीप्रसंगी उपस्थित लोण बुद्रुक- मुक्ताई पायी दिंडीतील वारकरी.

# लोण बुद्रुक- मुक्ताई दिंडीची श्री मंगळग्रह मंदिरास भेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील श्रीक्षेत्र लोण बुद्रुक येथील विठ्ठल मंदिरातून पारंपरिक पायी दिंडीचे रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी मेहुण आदिशक्ती मुक्ताईकडे प्रस्थान झाले आहे. या दिंडीने सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी दुपारी येथील श्री मंगळग्रह मंदिर येथे भेट दिली. श्री मंगळग्रह देवतेचे दर्शन घेऊन ही दिंडी पुढे मार्गस्थ झाली.

या दिंडीमध्ये संतश्री तुकाराम महाराज, संतश्री नामदेव महाराज, संतश्री एकनाथ महाराज, संतश्री ज्ञानेश्वर महाराज तसेच वारकरी परंपरेतील थोर संतांच्या प्रतिमा आहेत. भगवे ध्वज, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि “विठ्ठल विठ्ठल” नामस्मरणात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. ही दिंडी आदिशक्ती मुक्ताई संस्थान (मेहुण) यांच्यातर्फे आयोजित करण्यात आली अहे. ह.भ.प. भगवान महाराज (मेहुण बुद्रुक) यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी मार्गक्रमण करीत आहे. श्री विठ्ठल मिस्तरी यांच्या प्रेरणेने चालणारा हा वारसा मोठेबाबा यांच्या प्रेरणेने ही दिंडी अखंडपणे सुरू आहे. दिंडीदरम्यान भजन, अभंग व कीर्तनाच्या माध्यमातून वारकरी परंपरा जपली जात आहे. मार्गातील विविध गावांमध्ये भाविकांकडून दिंडीचे स्वागत होत आहे. सोमवारी दिंडीने श्री मंगळ ग्रह मंदिर येथे भेट दिली. यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे पदाधिकारी व सेवेकऱ्यांनी दिंडीचे स्वागत केले. सुरुवातीला १५ भाविकांचा सहभाग आहे. दिंडी मार्गात विविध गावांतील भाविक दिंडीत सहभागी होत आहेत. तापीपूर्णा संगम, सोमेश्वर मंदिर, मार्तंड ऋषी तपोभूमी, चांगदेव महाराज मंदिर अशा धार्मिक स्थळांना भेटी देत ही दिंडी गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी श्रीक्षेत्र मुक्ताई येथे पोहोचल.

# जळगाव, धुळे, संभाजीनगर, गुजरातच्या बससाठी नाशिकमधील 'स्टॅण्ड' बदलले

## पुणे- मुंबईसाठी 'हे' स्थानक निश्चित!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चार प्रमुख रस्ते व सात उपरस्ते एकत्र येणाऱ्या द्वारका चौकातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी भुयारी मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. या परिसरात अवजड वाहने, खासगी प्रवासी बस, एसटी, सिटीलिंक बसेसला पुढील तीन महिने प्रवेश बंद केला गेला आहे.

नाशिक - कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, शहरातील वाहतुकीचा केंद्रबिंदू असणाऱ्या द्वारका चौकात भुयारी मार्गाचे काम सुरू झाल्यामुळे वाहतुकीत झालेल्या बदलामुळे राज्य परिवहन महामंडळाने जळगाव, धुळे, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगरसह गुजरातला जाणाऱ्या बस गाड्या निमाणी स्थानकातून सोडण्यास सुरुवात केली आहे. मेळा, नवीन (ठक्कर बाजार) आणि महामार्ग बस स्थानकातून राज्यातील काही निवडक भागात बसेस सोडण्यात येणार आहे. या बदलामुळे पहिल्या दिवशी प्रवाशांमध्ये गोंधळ उडाल्याचे पहायला मिळाले.

द्वारका चौक वाहतुकीस बंद असल्याने एसटी महामंडळाला मध्यवर्ती भागातील स्थानकांऐवजी पंचवटीतील निमाणी स्थानकातून बसेस सोडण्याचे नियोजन करावे लागले. निमाणी बसस्थानकाचा वापर मनपाच्या सिटीलिंक बससेवेसाठी केला जात होता. पोलिसांच्या सूचनेनुसार सिटीलिंकने निमाणी येथून सुटणाऱ्या आपल्या बसेस तपोवन बस डेपोतून सोडण्यास सुरुवात केली. निमाणी स्थानकाचा वापर आता एसटी महामंडळाकडून सुरू झाला आहे.

रविवारपासून महामंडळाने निमाणी बस स्थानकातून सूरत, वापी, बलसाड, इंदूर या परराज्यातील बस फेऱ्यांसह जळगाव, चोपडा, धुळे, नंदुरबार, शिरपूर, साक्री नवापूर, सटाणा, शहरादा, धुळे व जळगाव मार्गावरील सर्व बस, मालेगाव, मनमाड, नांदगावला जाणाऱ्या बसच्या फेऱ्या सोडण्यास सुरुवात केली. या शिवाय, येवला, लासलगाव, जालना, छत्रपती संभाजीनगर, जिंतूर, बुलढाणा, लोणार या ठिकाणी आणि या मार्गे पुढे जाणाऱ्या सर्व बसच्या फेऱ्या निमाणी स्थानकातून सोडल्या जाणार असल्याची माहिती विभाग नियंत्रकांनी दिली. रविवारपासून लागू झालेले हे बदल पुढील आदेशापर्यंत कायम राहणार आहेत. पहिल्या दिवशी या बदलांची कल्पना नसल्याने प्रवासी वर्गात गोंधळ उडाला. मध्यवर्ती बस स्थानकांवर आलेल्यांना रिक्षा वा बसने पंचवटीतील निमाणी स्थानक गाठावे लागले.



**मुंबई, पुणे, शिर्डीचे काय ?**

सद्यस्थितीत स्थानकातून पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारासह या मार्गावरील व पुढे जाणाऱ्या सर्व बसच्या फेऱ्या सुटतील. नवीन बसस्थानक अर्थात ठक्कर बजार स्थानकातून त्र्यंबकेश्वर, सिन्नर व इगतपुरी, गिरणारे, हरसूल ओझरखेड मार्गावरील ग्रामीण फेऱ्या सोडल्या जातील. महामार्ग स्थानकातून शिर्डी, मुंबई मार्गावरील सर्व फेऱ्या आणि अहिल्यानगर मार्गावरील सर्व फेऱ्या सुटणार आहेत.

# संपादकीय

## आत्मपरीक्षणाची वाट : खऱ्या साधनेची सुरूवात

मानवी जीवनातील सर्व साधनांची पहिली आणि अपरिहार्य पायरी म्हणजे स्वतःच्या अवगुणांचे दर्शन. जोपर्यंत मनुष्याला आपल्यातील दोष जाणवत नाहीत तोपर्यंत साधनेचा खरा प्रारंभच होत नाही. परमार्थाच्या वाटेवर चालू लागल्यावर जसे-जसे साधन वाढते, तसे-तसे आपल्या अंतःकरणातील अवगुण अधिक तीव्रतेने समोर येऊ लागतात. हे अवगुण कधी-कधी इतके प्रखर वाटतात, की आपण त्यांच्याखाली दबून गेलो आहोत, अशी भावना निर्माण होते. अशा वेळी मनात प्रश्न उभा राहतो 'इतक्या अवगुणांनी भरलेल्या अवस्थेत परमेश्वर दर्शनाची अपेक्षा तरी कशी करावी?' मात्र हेच अवगुण स्पष्टपणे दिसू लागणे, ही साधनेची अपयशाची नव्हे, तर प्रगतीचीच खूण असते.

साधनपूर्व अवस्थेत माणूस आपल्या दोषांची खंतही बाळगत नाही. राग, अहंकार किंवा कठोरता यांना तो व्यवहाराचा भाग समजतो. 'व्यवहारात दरारा हवा,' असे सांगून तो स्वतःलाच समर्थन देत राहतो. परंतु जेव्हा साधना सुरू होते तेव्हा तेच दोष प्रकर्षाने जाणवू लागतात. प्रत्यक्षात हे दोष नवीन निर्माण होत नाहीत; ते आधीपासूनच अस्तित्वात असतात. फरक इतकाच, की साधनेमुळे त्यांची जाणीव होऊ लागते. क्रोध वाईट आहे, अहंकार अडथळा आहे, हे उमजू लागते आणि हीच खरी जागृती असते. मानवस्वभावाचा एक मोठा दोष म्हणजे स्वतःकडे दुर्लक्ष करून दुसऱ्यांचे दोष शोधण्याची वृत्ती. जोपर्यंत माणसाला स्वतःचे खरे स्वरूप दिसत नाही तोपर्यंत त्याला इतरांतील उणिवाच अधिक स्पष्ट दिसतात. प्रत्यक्षात दुसऱ्यांमध्ये जे दोष आपल्याला खटकतात त्यांचे बीज आपल्यातच दडलेले असते, हे स्वीकारणे हीच आत्मपरीक्षणाची पहिली पायरी आहे.

दुसऱ्यांचे अवगुण पाहणे हा सामान्य व्यवहार आहे; तो परमार्थ नव्हे. खरा परमार्थी तोच, जो सतत आत्मपरीक्षण करीत असतो. ज्याच्या नजरेत स्वतःचे दोष इतके स्पष्ट असतात, की त्याला इतर सर्वजण परमेश्वररूप भासू लागतात. ही अवस्था म्हणजेच परमार्थाची पराकाष्ठा होय. आत्मपरीक्षा करून स्वतःमधील अवगुणांच्या बीजांचे उच्चाटन करणे हे अत्यंत मोठे साधन आहे आणि हे साध्य करण्यासाठी नामस्मरणासारखे प्रभावी साधन दुसरे नाही. नाम घेतल्याने मन स्वच्छ होते, अहंकार गळून पडतो आणि स्वतःचे खरे दर्शन घडते. हे दर्शन कधी वेदनादायक असले, तरी तेच मुक्तीकडे नेणारे असते. आजच्या अस्वस्थ, दोषारोपांनी भरलेल्या समाजात आत्मपरीक्षणाची ही शिकवण अधिकच महत्त्वाची ठरते. दुसऱ्यांकडे बोट दाखविण्याऐवजी स्वतःकडे पाहण्याची सवय लागली, तरच व्यक्ती, समाज आणि अध्यात्म तिन्ही स्तरांवर खरा परिवर्तनाचा आरंभ होऊ शकतो.



जळगाव : श्री व्यंकटेश मशरूम फार्मवर वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थी- विद्यार्थिनी.

## श्री व्यंकटेश मशरूम फार्मवर वनस्पतीशास्त्र विभागाचा अभ्यासदौरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागाचा रूसा अंतर्गत विद्यार्थ्यांनी जळगाव येथील श्री व्यंकटेश मशरूम फार्मवर भेट दिली. यावेळी त्यांनी वनस्पती शास्त्राविषयी माहिती जाणून घेतली.

या अभ्यासदौऱ्याचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना मशरूम उत्पादनाचे शास्त्रीय तंत्रज्ञान, आधुनिक लागवड पद्धती, उत्पादन व्यवस्थापन, मशरूम उद्योगातील स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधींबाबत प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता. फार्मचे संचालक व तज्ज्ञांनी बटन मशरूम व ऑयस्टर मशरूम यांच्या लागवडीसाठी आवश्यक असलेले तापमान व आर्द्रता नियंत्रण, स्पॉन निर्मिती, सबस्ट्रेट तयारी, निर्जंतुकीकरण प्रक्रिया, उत्पादन वाढीच्या पद्धती, काढणी तसेच पॅकिंग व विपणन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मशरूम उत्पादन युनिट, आधुनिक उत्पादन कक्ष, स्वच्छता व गुणवत्ता नियंत्रण व्यवस्था तसेच साठवण व पॅकिंग विभागाचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. या अभ्यास दौऱ्याने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यासह कृषीआधारित उद्योग व स्टार्टअप संकल्पनांबाबत जागरूकता निर्माण झाली. वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. जयेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी सहभागी झाले होते. रूसा अंतर्गत आयोजित अशा उपक्रमांमुळे शैक्षणिक अभ्यासक्रमाला व्यावहारिक जोड मिळते, असे मत प्रा. साळवे यांनी व्यक्त केले.

या उपक्रमाचे खानदेश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष सीए नीरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, खानदेश शिक्षण मंडळाचे सर्व पदाधिकारी, सचिव प्रा. पराग पाटील, प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. एच. डी. जाधव, आयक्यूएसी समन्वयक डॉ. मुकेश भोळे, विभागप्रमुख प्रा. जयेश साळवे, प्रा. प्रगती पाटील, प्रा. हर्षाली चौधरी, प्रा. ज्योती पडूळ, प्रा. हर्षदा शिंदे, प्रा. कल्याण लोहार, संदीप बिऱ्हाडे, कुलसचिव राकेश निळे, लेखापाल देवेंद्र कांबळे, मुख्य लिपिक भटू चौधरी तसेच मानव सरदार व रेहान मुजावर यांनी कौतुक केले आहे.

## 'सिंदखेडा चॅम्पियन' संघाने पटकावले विजेतेपद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : वेस्टर्न रेल्वे एम्प्लॉईज युनियनच्या येथील शाखेतर्फे रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी प्रताप महाविद्यालयातील मैदानावर क्रिकेट स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत एकूण १० संघांनी सहभाग घेतला. पाळधी स्टेशनपासून ते सिंदखेडा स्टेशनपर्यंत कार्यरत रेल्वे कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत " सिंदखेडा चॅम्पियन" संघाने विजेतेपद पटकावले, तर "आरपीएफ ११ वॉरियर" संघाने उपविजेतेपद पटकाविले. या स्पर्धेस पश्चिम रेल्वेचे जनरल सेक्रेटरी कॉ. जे. आर. भोसले, विभागीय असिस्टंट अभियंता महेशकुमार गोस्वामी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वीतसेसाठी पश्चिम रेल्वे शाखेचे शाखा सचिव कॉ. किरण शिंदे व शाखा अध्यक्ष कॉ. दिनकर बोरसे यांनी परिश्रम घेतले.



अमळनेर : विजेतेपद पटकावल्यानंतर जल्लोष करताना सिंदखेडा क्रिकेट चॅम्पियन संघ.

## सरपंचांचा कार्यकाळ संपुष्टात!

### अमळनेर तालुक्यात ६७ ग्रामपंचायतींवर प्रशासक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील एकूण ११९ ग्रामपंचायतींपैकी ६७ ग्रामपंचायतींची मुदत फेब्रुवारी २०२६ मध्ये संपुष्टात आली आहे. या ग्रामपंचायतींवरील सरपंच व सदस्यांचे राजकीय कार्यकाळ संपणार असल्याने आता त्या ठिकाणी प्रशासक बसणार आहेत.

तालुक्यातील आंचलवाडी, आर्डी, आटाळे, बोदर्डे, बोहरा, धानोरा, दापोरी बुद्रुक, धावडे, ढेकू खुर्द, देवगाव, चौबारी, एकलहरे, एकतास, फापोरे बुद्रुक, एकरुखी, गांधली, गडखांब, गलवाडे खुर्द, गलवाडे बुद्रुक, हिंगोणे खुर्द प्र. अ., हिंगोणे खुर्द प्र. ज., जवखेडा, जुनोने, जळोद, करणखेडे, कळंबे, कलाली, कावपिंप्री, कळमसरे, कंडारी, कुहे बुद्रुक, खेडी प्र. ज., खवशी, खेडी प्र. अ., लोण खुर्द, लोण चारम, मेहेरगाव, म्हसले, मांडळ, मुडी प्र. अ., निंभोरा, नांद्री, निम, पिळोदे, पातोंडा, पाडसे, पळासदळे, प्र. डांगरी, पिंगळवाडे, पिंपळे बुद्रुक, पिंपळी प्र. ज., पाडळसरे, रामेश्वर बुद्रुक, रामेश्वर खुर्द, सारबेटे बुद्रुक, सारबेटे खुर्द, सावखेडा, सबगव्हाण, सोनखेडी, सात्री, शिरूड, शहापूर, तांदळी, टाकरखेडे, वासरे, वाघोदे, झाडी या ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. दरम्यान, आगामी काळात पंचायत समिती, जिल्हा परिषद व ग्रामपंचायतींच्या निवडणुका अपेक्षित असल्याने ग्रामीण भागातील राजकारण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. ग्रामपंचायत निवडणुका लांबल्याने प्रथम जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका घेणे क्रमप्राप्त ठरत आहे.

## हळदीचे दूध 'या' लोकांनी चुकूनही पिऊ नये !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रभावी अँटिऑक्सिडंट आणि अँटी- इन्फ्लेमेटरी गुणधर्म असलेले हळदीचे दूध आरोग्यदायी मानले जाते. हळदीचे दूध अनेकांसाठी आरोग्यदायी असले तरी काही गटांतील लोकांनी ते टाळणे अधिक योग्य ठरते.


हळद पित्तनिर्मिती वाढवते. त्यामुळे पित्ताशयातील खडे किंवा पित्तनलिकेतील अडथळा यांसारख्या समस्या अधिक बळावू शकतात. नियमित हळदीचे दूध पिल्याने वेदना वाढू शकतात. कर्फ्यूमिनमध्ये नैसर्गिक रक्त पातळ करण्याचे गुणधर्म असतात. वॉरफरिन, ॲस्पिरिन किंवा क्लोपिडोग्रेलसारखी औषधे घेत असाल, तर हळदीचे दुधासोबत सेवन केल्यास रक्तस्राव वाढू शकतो. हळद शरीरातील लोह शोषणात अडथळा आणू शकते. त्यामुळे ॲनिमिया किंवा कमी हिमोग्लोबिन असलेल्या लोकांसाठी गंभीर ठरू शकते. हळदीत ऑक्सलेट्स असतात, जे कॅल्शियमसोबत मिळून मूत्रपिंडातील खडे तयार करू शकतात, त्यामुळे मुतखड्याचा त्रास असणाऱ्यांनी हळदीचे दूध पिणे टाळावे. ॲसिडिटी, अल्सर किंवा गॅस्ट्रोइसोफेजियल रिफ्लक्स डिसीज असलेल्यांमध्ये हळदीच्या दूधामुळे पोट फुगणे, छातीत जळजळ किंवा मळमळ वाढवू शकते. हळदीचे दूध जास्त प्रमाणात घेतल्यास गर्भाशय उत्तेजित होऊ शकते किंवा हार्मोनल संतुलनावर परिणाम होऊ शकतो.

## रोहित, युगेंद्र, जय की पार्थ...?

### बारामतीचा वारसदार कोण? पवारांकडून तरुण नेत्यांवर जबाबदारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पवार घराण्यातील नवी पिढी (स्व.) अजितदादा पवारांची जबाबदारी सांभाळेल असे शरद पवारांनी सांगितले होते. जय पवार, पार्थ पवार, युगेंद्र आणि रोहीत पवार यांच्यापैकी ही जबाबदारी कोण सांभाळणार याची उत्सुकता आता राज्यात निर्माण झाली आहे.



(स्व.) ना. अजितदादा पवारांच्या मृत्यूनंतर बारामती शहराची काळजी कोण घेणार ? असा प्रश्न बारामतीकरांना पडला आहे. बारामती शहराचा विकास आणि पवार घराणे हे समीकरण आहे. आधी शरद पवार आणि मग (स्व.) अजितदादा पवार हे बारामती शहराचे पालक होते. (स्व.) अजितदादा पवारांनी आठवड्याचे ठराविक दिवसच बारामतीसाठी राखीव ठेवले होते. मोठी गोष्ट म्हणजे बारामतीच्या प्रत्येक विकासकामाची पाहणी अजित पवार पहाटे पहाटे करायचे. बारामतीत कोणती विकासकामे चालू आहेत. त्यांची सद्यस्थिती काय याची प्रत्येक अपडेट (स्व.) अजितदादा पवारांकडे असायची. आता (स्व.) अजितदादा पवारांनंतर बारामती शहराच्या विकासाकडे कोण पाहणार ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. शरद पवारांनी याबाबत काहीतरी नक्कीच ठरवले असावे. बारामतीच्या पालकत्वाची जबाबदारी नव्या पिढीकडे देण्यात येईल असे शरद पवारांनी सांगितले.

शरद पवारांनी नव्या पिढीचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर नव्या पिढीतील बारामतीच्या पालकत्वाची जबाबदारी कोण स्वीकारणार याची चर्चा आता सुरु झाली आहे. रोहित पवार, युगेंद्र पवार, पार्थ पवार, जय पवार हे तरुण पवार कुटुंबात सध्या कार्यरत आहेत. शरद पवार हे योग्य जबाबदार तरुणाची निवड करतील असा विश्वास पवार कुटुंबीयांचे निकटवर्तीय विठ्ठल मणियार यांनी व्यक्त केलाय.

**बारामतीचे पालकत्व कोण घेणार?**

बारामतीकरांनीही आपापल्या परीने याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. (स्व.) अजितदादा पवार यांच्यानंतर उपमुख्यमंत्री कोण असणार याचे उत्तर श्रीमती सुनेत्राताई पवारांच्या रुपाने शोधण्यात आले. आता बारामतीचे पालकत्व कोण घेणार ? हे ही येत्या काळात स्पष्ट होणार आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर जि.जळगांव

जा.नं.७४८/ला.फि.२०२६-२७ अमळनेर दि.२३/०१/२०२६

### सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता अनुज्ञप्ती लायसेन्स फी भरणेबाबत

### जाहीर नोटीस

सर्व अनुज्ञप्ती धारक-

अडते, खरेदीदार कापूस खरेदीदार, भाजीपाला अडते, खरेदीदार, किरणा दुकानदार, हमाल, मापाडी, प्रक्रिया धारक, मदतनीस, गुरे, शेळ्या, मेंढ्या खरेदीवर इ. घटक यांना कळविण्यात येते की,

महाराष्ट्र शासनाने बाजार समितीच्या नियमात बदल केलेला असून अधिनियम १९६३ अंतर्गत त्या अनुषंगाने झालेल्या नियमांमधील सुधारणे नुसार उपरोक्त नियम-२, खंड १० नुसारच्या व्याख्येमध्ये बदल केला असून त्यानुसार बाजार समितीचे नविन वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विनियमन) नियम १९६७ च्या ६ च्या पोटनियम ५ (अ) व नियम ७ च्या पोटनियम २ (अ) मध्ये करण्यात आलेला सुधारणेत अनुसरुन प्रत्येक घटकास कळविण्यात येते की,

अनुज्ञप्ती सन २०२६-२७ करीता अनुज्ञप्ती नुतनीकरणाचे अर्ज दि. २८ फेब्रुवारी २०२६ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत करावयाचे आहेत. (सुटीचे दिवस सोडून) ज्यांना नुतनीकरण करावयाचे असेल त्यांनी बाजार समिती कार्यालयातून अर्ज घ्यावे तसेच अर्ज सादर करणेपूर्वी मागील संपूर्ण येणे रक्कम भरावयात अन्यथा नुतनीकरणासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत. कार्यालयातून योग्य माहिती घ्यावी व अर्जाची पूर्तता करावी. तसेच नविन लायसेन्स घेणाऱ्यांना योग्य ती माहिती कार्यालयातून मिळेल.

टीप १) लायसेन्स नुतनीकरण करतांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत बाजार फी व शेड / गाळे भाडे पेडचा दाखला जोडणे बंधनकारक आहे.

२) मुदतीत लायसेन्स नुतनीकरण न केल्यास महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियमन १९६३ व १९६७ च्या तरतुदीनुसार ३१ मार्च २०२६ नंतर येणाऱ्या अर्जाची योग्य ती लेट फी आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| डॉ. उन्मेषकुमार रोहिदास राठोड | श्री. प्रकाश काशिनाथ वाणी | श्री. अशोक आधार पाटील |
|---|---|---|
| सचिव | अनुज्ञप्ती समिती, चेअरमन | सभापती |

**कृषि उत्पन्न बाजार समिती अमळनेर, जि. जळगांव**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# किसान की बेटी का कमाल

सक्सेस स्टोरी

## सेल्फ स्टडी के दम पर कोमल पुनिया बनीं 'आईएएस'



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

"मंजिलें उन्हीं को मिलती हैं, जिनके सपनों में जान होती है, पंखों से कुछ नहीं होता, हौसलों से उड़ान होती है।" इस कहावत को सच कर दिखाया है राजस्थान की रहने वाली कोमल पुनिया ने। कोमल ने संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी) की सिविल सेवा परीक्षा में अखिल भारतीय छठी रैंक (एआयआर ६) हासिल कर न केवल अपने माता- पिता का नाम रोशन किया है, बल्कि उन करोड़ों युवाओं के लिए एक प्रेरणा बन गई हैं जो संसाधनों की कमी का हवाला देते हैं।

**संघर्ष और ग्रामीण पृष्ठभूमि**

कोमल एक साधारण किसान परिवार से आती हैं। उनके पिता राजस्थान के एक छोटे से गांव में खेती करते हैं। कोमल की इस सफलता के पीछे उनके पिता का अटूट विश्वास और कोमल की कड़ी मेहनत छिपी है। कोमल ने अपनी प्रारंभिक शिक्षा गांव के ही स्कूल से पूरी की और उसके बाद उच्च शिक्षा के लिए उन्होंने कड़ी मेहनत जारी रखी।

बिना कोचिंग के सफलता

कोमल की सफलता की सबसे खास बात यह है कि उन्होंने इस कठिन परीक्षा की तैयारी के लिए किसी भी नामी या बड़े कोचिंग संस्थान की मदद नहीं ली। कोमल का मानना है कि यदि आपके पास सही रणनीति और इंटरनेट जैसे डिजिटल संसाधन हैं, तो आप घर बैठे ही दुनिया की सबसे कठिन परीक्षाओं में से एक को पास कर सकते हैं।

कोमल ने अपनी तैयारी के

**दौरान इन बातों पर ध्यान दिया**

सीमित संसाधन : उन्होंने बहुत अधिक किताबें पढ़ने के बजाय बुनियादी किताबों (जैसे एनसीईआरटी) को बार-बार पढ़ा।

डिजिटल लर्निंग : कोमल ने यूट्यूब और अन्य ऑनलाइन प्लेटफॉर्म्स का उपयोग कठिन विषयों को समझने और करंट अफेयर्स की तैयारी के लिए किया।

अनुशासन : वे रोजाना १० से १२ घंटे पढ़ाई करती थीं और अपनी प्रगति का आकलन करने के लिए नियमित रूप से 'मॉक टेस्ट' देती थीं।

**माता-पिता का सहयोग**

कोमल बताती हैं कि उनके पिता ने कभी भी उन पर किसी बात का दबाव नहीं डाला। एक किसान होने के नाते उनके पिता जानते थे कि मेहनत का फल मीठा होता है। कोमल की मां ने भी घर के कामों से उन्हें दूर रखा ताकि वे अपना पूरा ध्यान पढ़ाई पर लगा सकें। जब परीक्षा के परिणाम घोषित हुए और कोमल का नाम टॉपर्स की सूची में आया, तो पूरे गांव में जश्न का माहौल था।

भविष्य के उम्मीदवारों के लिए संदेश कोमल पुनिया अब एक आईएएस अधिकारी के रूप में देश की सेवा करेंगी। अपनी जीत का मंत्र साझा करते हुए कोमल कहती हैं, "सफलता के लिए किसी बड़े शहर में जाना या महंगी कोचिंग लेना अनिवार्य नहीं है। अगर आपके भीतर संकल्प है और आप अपनी गलतियों से सीखने के लिए तैयार हैं, तो आप घर के एक कोने में बैठकर भी इतिहास रच सकते हैं।"

# उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी भगव्या पोशाखातील 'संन्यासी'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री भगव्या पोशाखातील 'संन्यासी' आहेत असे अनेकांना वाटते. त्यामुळे त्यांच्याबद्दलची तथ्ये जाणून घेऊया.

अजय मोहन बिश्त ऊर्फ (निवृत्तीनंतर) योगी आदित्यनाथ. एचएनबी गढवाल विद्यापीठातून उत्तर प्रदेशच्या इतिहासातील सर्वोच्च गुण (१०० टक्के). योगीजी हे गणिताचे विद्यार्थी आहेत. त्यांनी बी.एस्सी. (गणित) सुवर्णपदकासह उत्तीर्ण केले आहे. १९७२ मध्ये उत्तर प्रदेशातील एका मागासलेल्या पाचूर गावात अत्यंत गरीब कुटुंबात जन्म. ते आता ५४ वर्षांचे आहे.



भारतीय सैन्याच्या सर्वांत जुन्या गोरखा रेजिमेंटचे आध्यात्मिक गुरू. नेपाळमधील योगी समर्थकांचा एक मोठा गट, जो योगींना गुरू भगवान मानतात. मार्शल आर्ट्समध्ये आश्चर्यकारक उत्कृष्टता. एकाच वेळी चार जणांना पराभूत करण्याचा विक्रम. उत्तर प्रदेशातील प्रसिद्ध जलतरणपटू. अनेक मोठ्या नद्या पार केल्या. एक अकाऊंटिंग तज्ज्ञ जो संगणकावरही मात करतो. प्रसिद्ध गणितज्ज्ञ शकुंतला देवी यांनीही योगींची प्रशंसा केली. रात्री फक्त चार तासांची झोप. रोज पहाटे साडेतीन वाजता उठतात. योग, ध्यान, गोशाळा, आरती, पूजा ही रोजची दिनचर्या. दिवसातून फक्त दोनदाच खातात. संपूर्ण शाकाहारी. अन्नामध्ये कंद, मुळे, फळे आणि स्थानिक गाईचे दूध समाविष्ट आहे. आतापर्यंत त्यांना कधीही कोणत्याही कारणास्तव रुग्णालयात दाखल करण्यात आले नाही.

योगी आदित्यनाथ हे आशियातील सर्वोत्तम वन्यजीव प्रशिक्षकांपैकी एक आहेत. त्यांना वन्यजीव खूप आवडतात. योगी यांचे कुटुंब आजही ते खासदार किंवा मुख्यमंत्री होण्याआधीच्या स्थितीत आहे. काही वर्षांपूर्वी संन्यास घेतल्यानंतर योगी आजवर एकदाच घरी गेले आहेत. योगी यांचे फक्त एक बँक खाते आहे. त्यांच्या नावावर कोणतीही जमीन किंवा मालमत्ता नाही किंवा त्यांचा कोणताही खर्च नाही. ते स्वतःच्या पगारातून अन्न व कपडे खर्च करतात. उरलेले पैसे मदत निधीत जमा करतात. ही योगी आदित्यनाथ यांची व्यक्तिरेखा आहे. भारतातील खऱ्या नेत्याची व्यक्तिरेखा अशी असावी. असे संतच भारताला पुन्हा जागतिक नेता बनवू शकतात.

**। जय श्री राम ।**

# चप्पलमुळेही होऊ शकतो डायबिटीज!

## तज्ज्ञांचा सल्ला : कोणत्या प्रकारच्या चपला वापरू नये ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जेव्हा शरीर पुरेसे इन्सुलिन तयार करीत नाही तेव्हा मधुमेह होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) अहवालानुसार, जगभरात दरवर्षी अंदाजे १. ६ दशलक्ष लोक मधुमेहामुळे मरतात. २०३० पर्यंत हा आजार जगातील सातवा सर्वांत प्राणघातक आजार बनेल, असा दावाही त्यात करण्यात आला आहे. रक्तातील शर्करेची पातळी अनियंत्रित झाली की, मधुमेहाचा धोका वाढतो. मधुमेह हा जीवनशैलीशी संबंधित आजार आहे, ज्यासाठी कठोर आहार योजना, व्यायाम आणि झोपेच्या पद्धतींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मात्र, आपण वापरत असलेली चप्पलदेखील हा आजार कमी करण्यास मदत करू शकते का? चला जाणून घेऊया.

**मधुमेहाचा शरीरावर कसा परिणाम होतो?**

रुग्णांच्या शरीरात उच्च पातळीची रक्तशर्करा असल्यास त्यांच्या अनेक अवयवांवर त्याचा विपरीत परिणाम होतो. या रुग्णांमध्ये मूत्रपिंड, यकृत, स्वादुपिंड, आतडे, पित्ताशय, मूत्राशय, प्लीहा यांसारख्या महत्त्वाच्या अवयवांना नुकसान पोहोचण्याचा धोका जास्त असतो. या अवयवांवर होणाऱ्या विपरीत परिणामामुळे शरीरातील रक्तप्रवाहाचा वेग आणि ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो. मधुमेहींच्या रुग्णांच्या शरीरातील लहान रक्तवाहिन्या खराब होतात. अशा परिस्थितीत जेव्हा मूत्रपिंडांच्या रक्तवाहिन्यादेखील प्रभावित होतात, तेव्हा मूत्रपिंडे रक्तातील विषाक्त पदार्थ काढून टाकण्यास सक्षम राहत नाही. अशा परिस्थितीत योग्य चप्पल घालल्याने मधुमेहाच्या रुग्णांना मदत होऊ शकते, असे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे.

**पादत्राणांकडे लक्ष देणे का महत्त्वाचे?**

पूर्वी बरेच लोक हिरव्या गवतासारख्या मऊ पृष्ठभागावर अनवाणी चालत असत. यामुळे त्यांचे पाय, गुडघे व पाठ निरोगी राहते. अशा आशयाने वाक्य आणखी व्यवस्थित करून घे. त्यामुळे पायांचा शरीराशी असलेला नैसर्गिक संबंध जवळजवळ नष्ट होतो. म्हणूनच शरीराच्या नैसर्गिक प्रक्रियांमध्ये अडथळा येतो. अनेक डॉक्टरांचा असा विश्वास आहे की, तुम्ही वापरत असलेल्या पादत्राणांवरून तुमचे आरोग्य दिसून येते.

**मधुमेही रुग्णांनी कोणती चप्पल निवडावी?**

मधुमेही रुग्णांनी अशी चप्पल निवडावी, जी शरीराचे वजन समान रीतीने वितरित करून, पायांवर दाब कमी करतात. त्याव्यतिरिक्त आरामदायी गादी असलेले पादत्राणेदेखील वापरण्याचा सल्ला डॉक्टर देतात. हे वापरल्याने घोटे व टाचांना आधार मिळतो आणि दाबबिंदूंपासून होणारा त्रास कमी होतो. शूजचा आकारदेखील खूप महत्त्वाचा आहे. योग्य आकाराची पादत्राणे परिधान केल्याने पायांवर जखमा आणि फोड येण्यापासून रोखणे शक्य होते. कारण- मधुमेह असलेल्या रुग्णांमध्ये जखमा लवकर बऱ्या होण्याची शक्यता कमी असते.

# तापात तोंडाची चव गेली? मग 'हे' नक्की करा...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तापानंतर तोंडाला आलेली कडवटपणा घालवण्यासाठी 'हे' घरगुती उपाय ठरतील रामबाण.

**डाळिंबाची जादू :** तापात तोंडाला चव नसेल, तर ताजे डाळिंब खा. त्यामुळे जिभेची मरगळ दूर होऊन ताजेतवाने वाटेल.

**लोणच्याची गोडी :** जेवणाची रुची वाढवण्यासाठी ताटात लिंबाचे गोड लोणचे नक्की घ्या. त्यामुळे तोंडाचा कडवटपणा लगेच कमी होतो.

**पुदिना आणि लिंबू :** कोमट



पाण्यात पुदिना आणि लिंबू रस घालून त्याचे घोट घोट सरबत प्यायल्याने तोंडाला छान चव येते.

**आवळ्याचा चमत्कार :** तापात जिभेला चव येण्यासाठी आवळा सुपारी चघळणे हा एक उत्तम आणि सोपा मार्ग आहे.

**खास घरगुती चाटण :** किसलेले आले, लिंबू रस आणि थोडे काळे मीठ यांचे चाटण घेतल्यास जिभेवरील पांढरा थर स्वच्छ होतो.

**भूक वाढवण्यासाठी :** हे नैसर्गिक उपाय केवळ तोंडाची चवच सुधारत नाहीत, तर तुमची भूक वाढविण्यासही मदत करतात.

**आरोग्याची काळजी :** औषधांच्या उष्णतेमुळे गेलेली चव परत मिळवण्यासाठी या उपायांसोबतच भरपूर पाणी प्या आणि विश्रांती घ्या. जेणेकरून तुम्ही लवकर बरे व्हा

### नोव्हाक जोकोविचचा 'बनावट बाळ'

विंबल्डन दरम्यान जोकोविच प्रेक्षकांसोबत खेळकर वर्तनासाठी ओळखला जातो. एका स्पर्धेत एका लहान चाहत्याने टॉय बेबी त्याच्याकडे फेकला. तोही हसत म्हणाला, की मी आता बाबा झालो का? त्याने बाळाला प्रेमाने उचलून घेतले. काही क्षण कोर्टावर त्याला झोपवले. प्रेक्षक हसून लोटपोट झाले.



# आईस्क्रीमचा शोध नेमका कधी लागला? इतिहास वाचून वाटेल आश्चर्य !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आईस्क्रीमचा जन्म कसा झाला याची अनेकांना कल्पना नाही. अनेक जण आवडीने आईस्क्रीम खातात. लहान मुलांचा तर हा सर्वात आवडता खाद्यपदार्थ असतो.

प्रत्येकालाच आईस्क्रीम खायला आवडते. आजकाल आईसक्रीमचे वेगवेगळे फ्लेवर मिळतात. १०० रुपयांपासून ते कित्येक हजार रुपयांपर्यंतची आईसक्रीम तुम्हाला मिळू शकते. संपूर्ण जगात आईसक्रीम हा पदार्थ आवडीने खाल्ला जातो.



सध्या तर आईसक्रीम खाण्याचे प्रमाण जास्तच वाढलेले आहे. त्यामुळे अनेकांना वाटते, की हा खाद्यपदार्थ नवा आहे. त्याची निर्मिती गेल्या काही वर्षांपूर्वीच झाली असावी. मात्र, सत्य वेगळेच आहे. आईसक्रीमची निर्मिती खूप अगोदरच झालेली आहे.

साधारण २०० इ. स पूर्वी लोक दूध आणि तांदळाचे मिश्रण असलेला एक पदार्थ आवडीने खायचे. त्याला अगोदर थंड केले जायचे. त्यामुळे तो आजकालच्या आईसक्रीमप्रमाणेच वाटायचा. जुन्या काळात ग्रीस आणि रोममध्ये लोक अशा प्रकारचे खाद्यपदार्थ खूप महाग होते. असे खाद्यपदार्थ खायला असणे तेव्हा प्रतिष्ठेचे मानले जायचे. १३ व्या शतकात मार्को पोलो नवाच्या व्यक्तीने चीनमधून दुधाच्या डेझर्टचे प्रकार इटलीला आणले. त्यानंतर हा खाद्यपदार्थ हळूहळू संपूर्ण युरोपमध्ये पसरला आणि आवडीने खाल्ला जाऊ लागला. सोळाव्या शतकापासून आईस्क्रीम सामान्य लोकांसाठी उपलब्ध होऊ लागली. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी म्हणजेच १८५१ साली जॅकब फुसेल या व्यक्तीने यूकेमध्ये जगातील पहिला आईस्क्रीमचा कारखाना चालू केला आणि तेव्हापासून आईस्क्रीम हा खाद्यपदार्थ संपूर्ण जगात पोहोचला. (टीप- या लेखातील माहिती प्राथमिक स्त्रोतांवर आधारलेली आहे. अधिक माहितीसाठी तज्ज्ञांशी संपर्क साधावा.)

# दीडशे वेळा केला बदल, बाथरूममध्ये रेकॉर्ड केलेले हे गाणे बनविण्यासाठी लागली दोन वर्षे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पासष्ट वर्षांपूर्वी आलेला १ कोटी खर्च दीडशे वेळा एडिट, बनविण्यासाठी लागली होती २ वर्षे. बाथरूममध्ये रेकॉर्ड केले होते गाणे. ज्याला बनविण्यासाठी ६५ वर्षांपूर्वी आला होता १ कोटी खर्च. आजही ते गाणे प्रचंड लोकप्रिय आहे.



बॉलिवूड इंडस्ट्रीमध्ये असे काही चित्रपट आहेत. ज्यांनी प्रेक्षकांच्या मनावर एक वेगळाच ठसा उमटविला. अशा चित्रपटांमधील काही सीन हे इतके गाजले की त्यांची आजही चर्चा होते. असाच एक चित्रपट ज्याने बॉक्स ऑफिस गाजवले त्यासोबत आजही ही चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात मैलाचा दगड ठरलेला 'मुगल-ए-आजम' हा चित्रपट १९७० मध्ये प्रदर्शित झाला आणि आजही तो प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. भव्य सेट्स, दमदार संवाद, अजरामर संगीत आणि जबरदस्त अभिनय यामुळे हा चित्रपट आजही तितकाच प्रेक्षकांना आवडतो. तब्बल ६५ वर्षांपूर्वी तयार झालेल्या या ऐतिहासिक चित्रपटात अनेक दिग्गज कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. या चित्रपटातील प्रत्येक गाणे आजही क्लासिक मानले जाते. मात्र, त्यातील 'प्यार किया तो डरना क्या' हे गाणे विशेषतः प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान मिळवून आहे. मधुबालाच्या सौंदर्याने, लता मंगेशकर यांच्या मधुर आवाजाने आणि नौशाद यांच्या अजरामर संगीताने सजलेले हे गाणे आजही ऐकले की अंगावर रोमांच उभे राहतात.

**भव्य सेट आणि अभूतपूर्व खर्च**

हे गाणे मोहन स्टुडिओमध्ये उभारण्यात आलेल्या एका भव्य सेटवर चित्रित करण्यात आले होते. हा सेट तब्बल १५० फूट लांब, ८० फूट रुंद आणि ३५ फूट उंच होता. विशेष बाब म्हणजे या एका गाण्यासाठी जवळपास दोन वर्षांचा कालावधी लागला. त्या काळात या सेटसाठी १ कोटी रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला होता, जो त्या वेळच्या कोणत्याही हिंदी चित्रपटाच्या एकूण बजेटपेक्षाही जास्त होता. आजच्या काळात जर या गाण्याचे चित्रीकरण झाले असते तर त्याचा अंदाजे खर्च सुमारे ५५ कोटी रुपये झाला असता असे इंडस्ट्रीतील तज्ज्ञ मानतात.

शकील बदायूनी यांनी या गाण्यासाठी अफाट मेहनत घेतली. नौशाद यांनी गाण्याच्या प्रत्येक ओळीवर बारकाईने लक्ष दिले आणि अंतिम स्वरूप देण्याआधी गीतामध्ये अनेकदा बदल करून घेतले. आश्चर्याची बाब म्हणजे, हे गाणे मंजूर होईपर्यंत त्यात सुमारे १५० वेळा एडिटिंग करण्यात आली होती. या गाण्याला अमर करणाऱ्या लता मंगेशकर यांनी आपल्या आवाजातून या गीताला वेगळीच उंची दिली. विशेष म्हणजे या गाण्यात इको इफेक्ट वापरण्यात आला होता, जो त्या काळात अत्यंत दुर्मिळ मानला जात होता. नौशाद काहीतरी वेगळे करायचे ठरवले होते. त्यामुळे त्यांनी लता मंगेशकर यांना थेट बाथरूम स्टुडिओमध्ये गाणे रेकॉर्ड करण्यास सांगितले, जेणेकरून गाण्याला नैसर्गिक आणि खोल इको इफेक्ट मिळू शकेल.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# नक्षत्र उपासना मंत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नक्षत्र २७ आहेत. प्रत्येकाने आपल्या नक्षत्र देवतेच्या मंत्राचा रोज १०८ वेळा जप केल्यास त्याचा ४० दिवसांत खूप चांगले फळ मिळते. आपली सर्व मनोकामना पूर्ण होण्यास मदत होते. जेवढा शक्य होईल तेवढा करावा. याला कुठलेही बंधन नाही. स्त्रियांनी मासिक पाळीवेळी ५ दिवस करू नये.

**१) अश्विनी नक्षत्र वेद मंत्र**
ॐ अश्विनौ तेजसाचक्षुः प्राणेन सरस्वती वीर्य्यम वाचेन्द्रो बलेनेन्द्राय दधुरिन्द्रियम। ॐ अश्विनी कुमाराभ्यो नमः।

**२) भरणी नक्षत्र वेद मंत्र**
ॐ यमायत्वा मखायत्वा सूर्य्यस्यत्वा तपसे देवस्यत्वा सवितामध्वा नक्तु पृथ्विया स गवं स्पृशस्पाहिअर्चिरसि शोचिरसि तपोसी।

**३) कृतिका नक्षत्र वेद मंत्र**
ॐ अयमग्नि सहत्रिणो वाजस्य शांति गवं वनस्पतिः मूर्द्धा कबोरीणाम। ॐ अग्नये नमः।

**४) रोहिणी नक्षत्र वेद मंत्र**
ॐ ब्रहमजज्ञानं प्रथमं पुरस्ताद्विसीमतः सूरुचोवेन आवः सबुधन्या उपमा अस्यविष्टाः स्तश्चयोनिम मतश्चविवाह ( सतश्चयोनिमस्तश्चविधः ) ॐ ब्रहमणे नमः।

**५) मृगशिरा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ सोमधेनु गवं सोमाअवन्तुमाशु गवं सोमोवीरः कर्मणयन्ददाति यदत्यविदध्य गवं सभेयम्पितृ श्रवणयोम । ॐ चन्द्रमसे नमः ।

**६) आर्द्रा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ नमस्ते रूद्र मन्यवऽउतोत इषवे नमः बाहुभ्यां मुतते नमः । ॐ रुद्राय नमः ।

**७) पुनर्वसु नक्षत्र वेद मंत्र**
ॐ अदितिद्योरदितिरन्तरिक्षमदिति र्माताः स पिता स पुत्रः विश्वेदेवा अदितिः पंचजना अदितिजातम अदितिर्रजनित्वम । ॐ आदित्याय नमः ।

**८) पुष्य नक्षत्र वेद मंत्र**
ॐ बृहस्पते अतियदर्यौ अर्हाद दुमद्विभाति क्रतमज्जनेषु । यददीदयच्छवस ऋतप्रजात तदस्मासु द्रविण धेहि चित्रम । ॐ बृहस्पतये नमः ।

**९) अश्लेषा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ नमोऽस्तु सर्पेभ्योये के च पृथ्विमनुः। ये अन्तरिक्षे यो देवितेभ्यः सर्पेभ्यो नमः । ॐ सर्पेभ्यो नमः।

**१०) मघा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ पितृभ्यः स्वधायिभ्य स्वाधानमः पितामहेभ्यः स्वधायिभ्यः स्वधानमः । प्रपितामहेभ्य स्वधायिभ्य स्वधानमः अक्षन्न पितरोऽमीमदन्तः पितरोतितृपन्त पितरःशुन्धव्म । ॐ पितरेभ्ये नमः ।

**११) पूर्वाफाल्गुनी नक्षत्र वेद मंत्र**
ॐ भगप्रणेतर्भगसत्यराधो भगे मां धियमुदवाददन्नः । भगप्रजाननाय गोभिरश्वैर्भगप्रणेतृभिर्नुवन्तः स्यामः । ॐ भगाय नमः ।

**१२) उत्तराफालगुनी नक्षत्र वेद मंत्र**
ॐ दैव्या वद्धर्व्यू च आगत गवं रथेन सूर्य्यतव्चा । मध्वायज्ञ गवं समञ्जायतं प्रत्नया यं वेनश्चित्रं देवानाम ।
ॐ अर्यमणे नमः।

**१३) हस्त नक्षत्र वेद मंत्र**
ॐ विभ्राडवृहन्पिवतु सोम्यं मध्वार्य्युदधज्ञ पत्त व विहुतम वातजूतोयो अभि रक्षतित्मना प्रजा पुपोषः पुरुधाविराजति । ॐ सावित्रे नमः ।

**१४) चित्रा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ त्वष्टातुरीयो अद्धुत इन्द्रागी पुष्टिवर्द्धनम । द्विपदापदायाः च्छ्न्द इन्द्रियमुक्षा गौत्र वयोदधुः । त्वष्ट्रेनमः । ॐ विश्वकर्मणे नमः ।

**१५) स्वाती नक्षत्र वेद मंत्र**
ॐ वायरन्नरदि बुधः सुमेध श्वेत सिशिक्तिनो युतामभि श्री तं वायवे सुमनसा वितस्थुर्विश्वेनरः स्वपत्थ्या निचक्रुः। ॐ वायव नमः ।

**१६) विशाखा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ इन्द्रान्गी आगत गवं सुतं गार्भिर्नमो वरेण्यम । अस्य पात घियोषिता । ॐ इन्द्रान्गीभ्यां नमः !

**१७) अनुराधा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ नमो मित्रस्यवरुणस्य चक्षसे महो देवाय तदृत गवं सपर्यत दूरंदृशे देव जाताय केतवे दिवस्पुत्राय सूर्योयश गवं सत । ॐ मित्राय नमः ।

**१८) ज्येष्ठा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ त्राताभिंद्रमबितारमिंद्र गवं हवेसुहव गवं शूरमिंद्रम वहयामि शक्रं पुरुहूतभिंद्र गवं स्वास्ति नो मधवा धात्विन्द्रः । ॐ इन्द्राय नमः ।

**१९) मूल नक्षत्र वेद मंत्र**
ॐ मातेवपुत्रम पृथिवी पुरीष्यमग्नि गवं स्वयोनावभारुषा तां विश्वेदैवऋतुभिः संविदानः प्रजापति विश्वकर्मा विमुञ्च्त । ॐ निऋतये नमः ।

**२०) पूर्वाषाढ़ा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ अपाघ मम कील्वषम पकृल्यामपोरपः अपामार्गत्वमस्मद यदुः स्वपन्य-सुवः । ॐ अदुभ्यो नमः ।

**२१) उत्तराषाढ़ा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ विश्वे अद्य मरुत विश्वऽउतो विश्वे भवत्यग्नयः समिद्धाः विश्वेनोदेवा अवसागमन्तु विश्वेमस्तु द्रविणं बाजो अस्मै ।

**२२) श्रवण नक्षत्र वेद मंत्र**
ॐ विष्णोरराटमसि विष्णो श्नपत्रेस्थो विष्णो स्युरसिविष्णो धुर्वोसि वैष्णवमसि विष्नवेत्वा ।
ॐ विष्णवे नमः ।

**२३) धनिष्ठा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ वसोःपवित्रमसि शतधारंवसोः पवित्रमसि सहत्रधारम । देवस्त्वासविता पुनातुवसोः पवित्रेणशतधारेण सुप्वाकामधुक्षः । ॐ वसुभ्यो नमः।

**२४) शतभिषा नक्षत्र वेद मंत्र**
ॐ वरुणस्योत्त्मभनमसिवरुणस्यस्कुं मसर्जनी स्थो वरुणस्य ऋतसदन्य सि वरुण स्यत्रऋतमदन ससि वरुणस्यत्रऋतसदनमसि । ॐ वरुणाय नमः ।

**२५) पूर्वभाद्रपद नक्षत्र वेद मंत्र**
ॐ उतनाहिर्वुधन्यः श्रृणोत्वज एकपापृथिवी समुद्रः विश्वेदेवा ऋता वृधो हुवाना स्तुतामंत्रा कविशस्ता अवन्तु । ॐ अजैकपदे नमः।

**२६) उत्तरभाद्रपद नक्षत्र वेद मंत्र**
ॐ शिवोनामासिस्वधितिस्तो पिता नमस्तेऽस्तुमामाहि गवं सो निर्वत्तयाम्यायुषेऽत्राद्याय प्रजननायर रायपोषाय ( सुप्रजास्वाय ) ।
ॐ अहिर्बुधाय नमः ।

**२७) रेवती नक्षत्र वेद मंत्र**
ॐ पूषन तव व्रते वय नरिषेभ्य कदाचन । स्तोतारस्तेइहस्मसि । ॐ पूषणे नमः ।

**। श्री स्वामी समर्थ ।**

# तुळशी अतिपवित्र वृक्ष, तुळशी महात्म्य काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संत तुकाराम महाराज म्हणतात-
**जयाचियें द्वारी तुलसी वृंदावन। नाही ते स्मशान गृह जाणा ।।**

## तुळशीचे वैशिष्ट्य काय ?

तुळस ही वनस्पती वायूमंडलातील सात्त्विकता खेचण्यात आणि ती प्रभावीपणे जिवाकडे प्रक्षेपित करण्यात अग्रेसर आहे. ब्रह्मांडातील श्रीकृष्ण तत्त्व खेचून घेण्याची क्षमताही तुळशीत आहे.

## देवाला नैवेद्य दाखविताना तुळशीच्या पानाचा वापर का करावा?

देवाला नैवेद्य दाखविताना तुळशीच्या पानांचा वापर केल्याने नैवेद्य देवतेपर्यंत लवकर पोहोचणे, सात्त्विक होणे आणि त्याच्यावर वाईट शक्तींचे आक्रमण होण्याची शक्यता खूप कमी होते.

## तुळशीपत्र ठेवल्याने अनेक लाभ होतात.

१) तुळशीच्या पानाने नैवेद्य दाखविल्याने सात्त्विक अन्नातून प्रक्षेपित होणाऱ्या सूक्ष्म-लहरी तुळशीच्या पानाकडून ग्रहण केल्या जातात. असे सूक्ष्म-लहरींनी युक्त पान नंतर देवाला अर्पण केल्यामुळे देवतेच्या तत्त्वाकडून त्या लहरी पटकन ग्रहण केल्या जातात. अशा प्रकारे आपण अर्पण केलेले अन्न तुळशीच्या पानांच्या माध्यमातून देवतेपर्यंत लवकर पोचून देवता लवकर संतुष्ट होण्यास सहाय्य होते.

२) अन्नावर आलेले रज-तम कणांचे आवरण तुळशीचे पान नैवेद्यावर ठेवल्यामुळे न्यून (कमी) होते. तुळशीदलातून प्रक्षेपित होणाऱ्या सात्त्विक लहरींमुळे नैवेद्याभोवतीचे वायुमंडल शुद्ध झाल्याने नैवेद्यावर वाईट शक्तींचे आक्रमण होण्याची शक्यताही न्यून होते.

३) नैवेद्यावर भावपूर्णरित्या तुळशीदल ठेवल्याने ते त्याच्या उपजत गुणधर्माप्रमाणे देवतेकडून येणारे चैतन्य ग्रहण करून प्रभावीपणे नैवेद्याकडे संक्रमित करते. नंतर अशा नैवेद्याच्या सेवनाने जीवाच्या देहाला चैतन्यलहरी मिळण्यास सहाय्य होते.

आता आपण तुळशीची आध्यात्मिक वैशिष्ट्ये काय आहेत ते पाहू.

**१) पापनाशक**

तुलशीचे दर्शन, स्पर्श, ध्यान, नमन, पूजन, रोपण आणि सेवन या गोष्टी युगायुगांची पातके नष्ट करतात.

**२) पवित्रता**

तुळशीचे बन असलेल्या परिसरातील कोसभर भूमी गंगेसारखी पवित्र बनते. यासंदर्भात स्कन्दपुराणात (वैष्णवखण्ड, अध्याय ८, श्लोक १३ मध्ये) म्हटले आहे.

**तुलसीकानने चैव गृहे यस्यावतिष्ठते ।**
**तद्गृहं तीर्थभूतं हि नायान्तियमकिङ्कराः ॥**

अर्थ : ज्या घरी तुलसीचे वन आहे, ते घर तीर्थासारखे पवित्र होय. त्या घरात यमदूत येत नाहीत.

**३) सर्व देवतांचा वास असणे**

'तुलशीच्या वनस्पतीत मुळापासून अग्रापर्यंत सर्व देवता वास्तव्य करतात', असे सांगितले आहे.

**४) श्रीविष्णूंना परमप्रिय असणे**

१) तुलसी वृंदावनात राहते. ती श्रीविष्णूला परमप्रिय आहे.

२) तुलसीदलाविना श्रीविष्णूंची पूजा केल्यास ती व्यर्थ ठरते. पद्मपुराणात म्हटले आहे, की सुवर्ण, रत्ने आणि मोती यांची फुले श्रीविष्णूंना वाहिली, तरी त्यांना तुलसीदलाच्या १६ व्या कलेचीही सर येणार नाही.

३) तुलसीपत्र ठेवल्यावाचून किंवा तुलसीदलाने प्रोक्षण केल्यावाचून श्रीविष्णू नैवेद्य ग्रहण करत नाहीत.

४) कार्तिक मासात (महिन्यात) तुलसीदलाने केलेल्या विष्णुपूजेचे महात्म्य विशेष आहे.

५) श्रीविष्णू, श्रीकृष्ण किंवा पांडुरंग यांच्या गळ्यात तुळशीचा घवघवीत हार घालतात.

## तुळशीची पाने तोडू नयेत असे काही दिवस

रविवार, एकादशी, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, द्वादशी, संक्रांती, घरात कोणाचा जन्म झाल्यावर आणि नाव ठेवेपर्यंत, घरात कोणाचा मृत्यू झाल्यास तेराव्या दिवसापर्यंत.

तुळशीची पाने तोडू नयेत अशा काही वेळा
सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी, रात्री.

## तुळशीच्या रोपाबाबत काही नियमांची विशेष काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

तुळशी मातेची प्रार्थना करूनच तुळशीची पान तोडावीत. तुळशीच्या आसपास शमी वगळता अन्य कोणतेही काटेरी झाड लावू नये. ज्या घरात तुळशीचे रोप आहे तेथील स्वच्छतेवर विशेष लक्ष द्यायला हवे. रात्री तुळशीला हात लावू नये. विनाकारण तुळशीची पाने तोडू नयेत. तुळशीचे रोप भगवान विष्णूला अत्यंत प्रिय आहे, अशी पौराणिक मान्यता आहे. ज्या घरात स्त्रीया वारंवार आजारी असतात त्या घरासमोर तुळशीचे रोप लावावे व त्याची काळजी घ्यावी, रोग नाहीसे होतात.

## तुळशीसोबत ही रोपे लावण्यामुळे मिळते यश अफाट

घरात तुळशीचे रोप लावणे खूप शुभ असते. तुळशीचे रोप अतिशय पवित्र मानले जाते. तुळशीचे रोप आपल्या सभोवतालच्या परिसरात सकारात्मक ऊर्जा प्रसारित करते. तसेच घरात सुख-समृद्धी येते. घरातील लोकांचे आजारांपासून रक्षण करते, मुख्यकर्त्या माणसाच्या कामधंद्यात प्रगती होते. पैशाचा ओघ वाढतो. मात्र तुळशीचे रोप लावताना काही गोष्टींची काळजी घेतली तर त्यापासून मिळणारे फळ अनेक पटींनी वाढवता येते. शमी, फुलझाडे व काटेरी नसलेली वनस्पती ही शुभ रोपे तुळशीसोबत लावा.

तुळशीची पूजा केल्याने भगवान विष्णू आणि माता लक्ष्मींचा आशीर्वाद मिळतो. नशिबाने त्यांच्या कृपेने साथ मिळते. संपत्ती वाढते. परंतु तुळशीच्या रोपासोबत काही विशेष रोपे लावल्याने मिळणारे शुभ फळ अनेक पटींनी वाढते. त्यामुळे पैसा, नातेसंबंध, आरोग्य यासंबंधीच्या समस्या संपतात. यासोबतच प्रगतीच्या मार्गात येणारे अडथळेही संपतात. सहस्र तुलसीपत्रांनी भगवान विष्णूंना सहस्रनामानी अर्चन अथवा हवन केले तर अतिशय उत्तम अनुभव येतात.

बालकृष्णाला तुलसी अर्चन करून मुलांकडून रोज एकदा विष्णुसहस्रनाम म्हणवून घेतले तर त्यांचे उच्चार स्पष्ट व शुद्ध होण्यास मदत होते, ती तुळशीची पाने त्यांनी चावून खाल्ली तर त्यांची बुद्धी तेजस्वी होण्यास मदत होते. शिवालयात, तुलसीवनात बसून जो रोज विष्णुसहस्रनामाचे पाठ करतो, त्याला कोट्यवधी गायी दान दिल्याचे फल प्राप्त होते आणि त्याला मोक्ष प्राप्त होतो, असे चक्रपाणीचे वचन आहे.

## अशुभ बुधासाठी आणि बुद्धी, वाणी आणि एकाग्रता प्राप्तीसाठी उपाय

१) प्रातकाळी रोज तुळशीच्या पानांचे सेवन करावे, त्यानंतर 'ॐ ऐं सरस्वते नमः' चा जप करावा.

२) दर बुधवारी महविष्णूंना चंदनासहित तुळशीपत्र अर्पण करावे, विष्णुसहस्त्रनाम स्त्रोत्राचा पाठ करावा.

## तुलसी अर्चानेचा गायत्री मंत्र

**ॐ तुलसीदेव्यैच विद्महे, विष्णुप्रियायैच धीमहि, तन्नो वृन्दा प्रचोदयात् ।**

घरात नकारात्मकता आहे । ...मग हे करा...

आठवड्यातील कोणत्याही दिवशी फक्त येथे ठेवा ५ तुळशीची पाने.



घरात खूप आर्थिक अडचणी येतात. घरात पैसे टिकत नाहीत. घरात खूप मोठ्या अडचणी, दुःखाला आपल्याला सामोरे जावे लागते. खूप वेळा अप मेहनत करतो पण यश काही आपल्याला मिळत नाही. आपण देव-देव भक्तीभावाने सर्व काही करत तरी देखील आपल्याला ज्या अडचणी असतात त्या येतच राहतात. मग अशा वेळी काय करावे? अशा वेळेस तुम्ही काही स्वामींची मनापासून भक्तीभावाने पूजा व काही उपाय आहेत ते तुम्ही करू शकता. आज आपल्या लेखात आपण काही असेच उपाय पाहणार आहोत. जेणेकरून तुमच्या आर्थिक अडचणी दूर होतील. घरात अडचणी, संकटे येणार नाहीत. घरात बरकत येईल. घरात लक्ष्मीमातेची कृपा बरसेल. तुम्हाला हा उपाय अगदी आठवड्यातील कोणत्याही दिवशी केला तरी चालेल. या उपायकारात फक्त हवे आहेत ५ तुळशीची पाने.

घरातल्या तुळशीची ५ पाने आपल्याला घ्यायची आहेत. तुळशीची पाने ही सायंकाळी न तोंडता ती सकाळी-सकाळीच काढून घ्यावीत. ही पाने घेतल्यानंतर त्या पानांना एका भांड्यात घेऊन किंवा हातातच स्वच्छ पाण्याने धुवून घ्या. त्यानंतर त्या तुळशीची पाने हातात घेऊन एक मंत्र म्हणायचा आहे आणि तो मंत्र म्हणजे 'ओम तुलसी प्रिया नमः' हा मंत्र एक माळ करावा व ती तुळशीची पाने आपण आपल्या तिजोरीमध्ये किंवा आपल्या लॉकरमध्ये जेथे आपण आपले पैसे ठेवतो तेथे ठेवून द्यावेत. जर दुकान असेल तर आपल्या गल्ल्यात ही तुळशीची पाने ठेवावीत.

तुळस ही पवित्रता व शुद्धतेचे प्रतीक आहे. ही भगवान विष्णूंची प्रिय आहे आणि जेथे भगवान विष्णू वास्तव्य करतात तेथे लक्ष्मी माता आपोआप येतात. तेथे नेहमी बरकत राहते, सुखसमृद्धी नांदते. आपल्याला कोणत्याही आर्थिक अडीअडचणी येत नाहीत. रोज सकाळी कुटुंबातील महिलांनी स्नान केल्यानंतर तुळशीजवळ दिवा लावावा आणि तुलसी नामाष्टकचे पाठही करावेत.

## तुळशीचे महत्त्व सांगणारी कथा

पुराणात एक कथा सांगितली जाते. जालिंदर नावाचा एक अत्यंत पराक्रमी राक्षस असतो. आपल्या पराक्रमाच्या बळावर त्याने देवांना आणि साधू-संतांना पार त्राही-त्राही करून सोडलेले असते. त्याला कसे रोखायचे, असा प्रश्न सर्व देवांना पडतो. मग देव विष्णूंना शरण जाऊन जालिंदरापासून आपले रक्षण करण्याची विनंती करतात. विष्णूंनी जेव्हा जालिंदराबाबत माहिती काढली तेव्हा त्यांना असे कळाले, की त्याची पत्नी वृंदा ही सती पतीव्रता असते. तिच्या पतिव्रत्याच्या सामर्थ्यांनेच जालिंदर विजयी होत असतो. त्याला पराजीत करायचे असेल, तर वृंदाच्या पतिव्रत्याचा भंग करणे हाच उपाय उरतो. ते करण्यास कुणीही धजावत नाही. अखेर ती जबाबदारी विष्णू स्वीकारतात.

या दृष्ट कृत्याचा नाश करण्यासाठी भगवान विष्णू जालिंदराचे रूप धारण करून वृंदेच्या महालात जातात. आपले पती आले आहेत, असे समजून वृंदा त्यांना अलिंगन देते. तिच्या पतिव्रत्याचा भंग होताच जालिंदराचा मृत्यू होतो. देवांनी मारलेल्या बाणाने त्याचे शीर तुटते आणि ते वृंदेच्या दारात पडते.

नवऱ्याचे शीर पाहताच वृंदा चकीत होते आणि विष्णूंना विचारते, की 'तू कोण आहेस?' त्यावर विष्णू आपले खऱ्या रूपात प्रकटतात. संतप्त झालेली वृंदा विष्णूंना तू दगड होऊन पडशील आणि मला माझ्या पतीचा विरह तुझ्यामुळे घडला, तसाच तुलाही त्रेतायुगात मनुष्यजन्म घेऊन तुझ्या पत्नीचा विरह सहन करावा लागेल, असा शाप देते.

भगवंत तिची क्षमा मागतात. तेव्हा वृंदा म्हणते, की 'तू मला आता भ्रष्ट केलेस, आता मला कोण स्वीकारील?' तेव्हा भगवंत म्हणतात, की 'मी तुझा स्वीकार करतो. इतकेच नव्हे तर जे तुझी पूजा करतील त्यांच्यावर माझी कृपा असेल.' त्यानंतर वृंदा सती गेली. पुढे तिच्या शापामुळेच राम अवतारामध्ये भगवंताला सीता मातेचा विरह सहन करावा लागला.

देव दगड होऊन पडले. त्यालाच 'शालिग्राम' म्हणतात. ज्या ठिकाणी तिच्यावर अंत्यसंस्कार झाले तेथे तुळशीचे रोप उगवले. तीच ही तुळस. वृंदेच्या नावावरूनच ज्या ठिकाणी तुळस लावली जाते तिला 'वृंदावन' असे म्हटले जाते. तीच तुळस कृष्णाने व पांडुरंगानेही धारण केली. तिला भगवंताने स्वीकारले याचे प्रतीक म्हणून 'शालिग्राम' हा जो दगड आहे त्याला देव मानून त्याचा विवाह तुळशीसोबत लावला जातो. ती भगवंतांची प्रिय होते म्हणूनच तिला धारण करणाऱ्यांवर भगवंत प्रेम करतो, अशी श्रद्धा आहे. याच विचाराने वारकऱ्यांनीही तुळशीला आजतागायत पूजनीय मानले आहे.

## वैद्यकीय औषधी वनस्पती-तुळस

तुळशीच्या पानांना भारतात धार्मिक महत्त्व आहे. पण ते औषध म्हणूनही खूप वापरले जातात. तुळशी ही एक अशी वनस्पती आहे, की जी प्रत्येक घरात सहज आढळते. तुळशीला पवित्र तुळस असेही म्हणतात आणि तुळशीचे फायदे खूप चमत्कारिक आहेत. तुळशीच्या औषधी गुणधर्मामुळे अनेक आयुर्वेदिक आणि निसर्गोपचार रुग्णालयांमध्ये औषधी वनस्पती बनविण्यासाठीही तिचा वापर केला जातो. या 'वैद्यकीय औषधी वनस्पती'च्या अनेक जाती आहेत. त्यापैकी राम तुळशी आणि कृष्ण तुळशी सर्वांत सामान्य आहेत. पण दोघांमध्ये काय फरक आहे आणि चांगल्या आरोग्यासाठी तुम्ही कोणता निवडावा?

## राम तुळस आणि कृष्ण तुळस यांच्यातील फरक असा आहे

राम तुळशीचा वापर बहुतेक पूजेत केला जातो. ही तुळस त्याच्या औषधी गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे. तुळशीच्या या जातीच्या पानांना गोड चव असते. श्यामा तुळशीला 'गडद तुळशी' किंवा 'कृष्ण तुळशी' असेही म्हणतात. या तुळशीची पाने हिरवी व जांभळ्या रंगाची असून त्याची देठ जांभळ्या रंगाचे असतात. 'राम तुळशीला हिंदू धर्मात औषधांचा रामबाण उपाय म्हटले जाते. धार्मिक पूजेसाठी याचा वापर केला जातो.' 'कृष्ण तुळशीला जांभळ्या तुळशीचे पान म्हणूनही ओळखले जाते. ही तुळस कमी वापरली जाते, पण तिचे अनेक औषधी फायदेही आहेत.'

## कोणती तुळस फायदेशीर आहे?

दोन्ही तुळशींचे औषधी फायदे आहेत. दोन्ही तुळस ताप, त्वचारोग, पचन आणि रोगप्रतिकारशक्ती बरे करण्यासाठी वापरली जातात. चिंता आणि तणाव कमी करण्यासाठी देखील याचा वापर करतात. वजन कमी करण्यासाठी तुळशीचे पाणी वापरले जाते. याच्या सेवनाने सर्दी-खोकलाही दूर होतो. तुळशीला फायदेशीर आणि निसर्गाची देणगी असल्याचे मानले जाते. राम तुळस पचनासाठी फायदेशीर असल्याचे सांगितले. कृष्ण तुळस त्वचारोग आणि इतर अनेक आजारांवर औषधी आहे.

राम तुळस एक नैसर्गिक बूस्टर आहे. ती तणाव आणि उच्च रक्तदाब कमी करण्यासाठी वापरली जाते. त्यात कर्करोगविरोधी गुणधर्म आहेत आणि चांगले आरोग्य आणि पचन सुधारण्यास मदत करते. कृष्णा तुळस बऱ्याचदा लहान मुलांना खायला दिली जाते. सर्दी-खोकल्याचा त्रास, खूप तापावरही हे फायदेशीर आहे. त्यातील अँटीऑक्सिडंट गुणधर्म हृदयाच्या समस्या आणि मधुमेहासाठी देखील चांगले आहेत. यामुळे त्वचा चमकदार होते आणि केसांची लांबीही वाढते.

## कसे सेवन करावे?

तुळशीची दोन-तीन पाने रोज रिकाम्यापोटी खावीत. त्याचा चहा बनवता येतो रक्त स्वच्छ होण्यास मदत होते. हिंदू धर्मात तुळशीला अत्यंत पवित्र आणि लक्ष्मीचा अवतार मानले जाते. 'तुळशी महात्म्य' म्हणजे तुळशीची दैवी महिमा, जी पापनाशक, सुख-समृद्धी देणारी आणि मोक्षदायक मानली जाते। भगवान विष्णूंना तुळशी अत्यंत प्रिय आहे. त्यामुळे कोणत्याही पूजेत किंवा नैवेद्यात तुळशीचे पान (पत्र) अत्यावश्यक असते। तुळशीच्या पुजनाने सर्व तीर्थांचे पुण्य लाभते।

## तुळशी महात्म्याची प्रमुख वैशिष्ट्ये

**धार्मिक महत्त्व :** तुळशीच्या मुळात सर्व तीर्थ, मध्यभागात सर्व देवी-देवता आणि वरच्या शाखांमध्ये सर्व वेद वास करतात, अशी मान्यता आहे. कार्तिक महिन्यात तुळशी पूजनाला विशेष महत्त्व आहे. ज्यामुळे पुण्यवृद्धी होते.

**तुळशी विवाह :** वृंदाचे विष्णूंशी लग्न झाल्याच्या आख्यायिकेनुसार कार्तिकी शुद्ध द्वादशीला तुळशी विवाह करण्याची प्रथा आहे. जो घरगुती सुख-समृद्धी आणि वैवाहिक आनंदासाठी केला जातो.

**औषधीय महत्त्व :** तुळस केवळ पवित्र नाही, तर औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. यातील अँटीफंगल, अँटीबॅक्टेरियल तत्त्वे सर्दी, खोकला आणि घशाच्या विकारांवर रामबाण आहेत.

**दैनिक पूजेचे फळ :** रोज सकाळी तुळशीचे दर्शन आणि पूजन केल्याने पाप नष्ट होतात आणि मोक्ष मिळतो.

**घरगुती आरोग्य :** तुळशीचे जीवंत रोप रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि घरातील हवेचे शुद्धीकरण करते.

घरातल्या तुळशीचे महत्त्व ऑक्सिजनपुरते किंवा रोगप्रतिबंधक म्हणून नाही. इतर अनेक दृष्टीने ती आरोग्यदायिनी आहे. सर्दी-खोकला, घशाचे विकार यावर तुळस अत्यंत उपयुक्त.

तुळसीच्या पानांचा लेप चेहऱ्यावरची त्वचा उजळण्यास उपयोगी असतो. रोज सकाळी चार ते पाच तुळशीची पाने खाल्ल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढते. तोंडाला चव नसणे, अपचन यावरही उपयुक्त आहे.

**श्री तुळशी मातेच्या चरणी शत-शत नमन.**
**।। शुभम भवतु ।।**

# मन स्वाधीन होण्यासाठी मनापासून नाम घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगात आजपर्यंत पुष्कळ लोकांनी दानधर्म, स्वार्थत्याग केला. पण त्यांच्यामध्ये कर्तेपणाची जाणीव राहिल्याने खऱ्या अर्थाने त्यांना निःस्वार्थी बनता आले नाही. खरे म्हणजे आमचे मन आमच्या ताब्यात आल्याशिवाय आम्हाला निःस्वार्थी बनता येणार नाही. मन कोणत्या साधनाने आम्हाला आवरता येईल? योग, याग इत्यादी साधने त्यासाठीच सांगितली आहेत. मात्र ही साधने या काळात आम्हाला करता येण्यासारखी आहेत का? या साधनांसाठी लागणारी काळाची अनुकूलता आपण राहतो त्या परिस्थितीत आपल्याजवळ खास नाही. मन ताब्यात यायला सध्याच्या काळात नामस्मरणाशिवाय दुसरे साधनच नाही. कारण आज एक नामच भगवंताने अवताररूपाने आमच्यासाठी शिल्लक ठेवले आहे. तेव्हा मन स्वाधीन होण्यासाठी सर्वांनी मनापासून नाम घ्या. नाम घेत असताना मनाचे स्थैर्य बिघडविणारे जे विकार आहेत त्यांना आवरण्याचा प्रयत्न करा. मनाला सर्वांत मोठा विकार कोणता बाधत असेल तर तो म्हणजे अभिमान. या अभिमानासारखा आपला घात करणारा दुसरा शत्रू कोणी नसेल. तो अभिमान सोडायला आपण शिकले पाहिजे. भगवंताने आजपर्यंत एवढे अवतार घेतले ते सर्व अभिमान मारण्यासाठीच होते. हिरण्यकश्यपूच्या वेळी भगवंताने अवतार घेतला; पण देव समोर उभे असतानासुद्धा त्याचा हात नमस्काराकडे न जाता तरवारीकडे गेला. यावरून त्याचा अभिमान किती तीव्र असेल याची कल्पना येईल. तो अभिमान नाहीसा करण्यासाठी आपण कर्तेपणाची जाणीव सोडून नाम घेतले पाहिजे.

मनाची स्थिरता बिघडणारा दुसरा शत्रू म्हणजे राग. हा राग फार भयंकर असतो. मोठमोठ्या तपस्वी लोकांची तपश्चर्या याने धुळीस मिळविली आहे. हा राग आवरण्यासाठी आपल्याला राग कशामुळे येतो हे नीट समजून घेतले पाहिजे. व्यवहारात आपल्याला नीतीची बंधने घालून दिली आहेत, ती सर्व आपण पाळली पाहिजेत. नीतीच्या बंधनात राहणाऱ्या माणसाचे विकार आपोआप आवरले जातील. ही बंधने कशासाठी घातली आहेत याचे मर्म समजून घेऊन वागले तर राग आवरता येईल आणि राग आवरला म्हणजे त्याच्या पोटात लपून बसलेल्या काम, लोभ, मोह इत्यादी विकारांनाही पायबंद पडेल. याप्रमाणे नीतीच्या बंधनात राहून तुम्ही आपले मन भगवंताकडे विनम्र करा, भगवंताकडे जाऊ लागा, मन आपोआप तुमच्या मागे येईल. कारण तो त्याचा धर्म आहे. भगवंताला विसरू नका. तुमचे मन तुम्हाला आपण होऊन साह्य करेल याची खात्री बाळगा. नाम सुरुंगाप्रमाणे आहे. विकाररूपी मोठाले खडक ते फोडून टाकते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**